RESEARCH NEBULA
AN INDEXED, REFERRED & PEER REVIEWED JOURNAL

J-Gate INDEXED

ISSN 2277-8071

Indexed in the ICI Journals Master List

INDEX COPERNICUS INTERNATIONAL

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

DOI PREFIX 10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN IMPACT FACTOR 7.399

## TWO - DAY 47th ANNUAL CONFERENCE OF

## VIDHARBHA ARTHASHASTRA PARISHAD

3rd & 4th February, 2024

*Organized by*

## GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

MIDC Road Complex, Gadchiroli-442605, MH. (India)

Guest Editor
**Dr. Shriram Kawale**
Pro Vice – Chancellor,
Gondwana University,
Gadchiroli.

Executive Editor
**Dr. Shilpa Athawale**
Coordinator, PGTD of Applied Economics,
Gondwana University,
Gadchiroli.

Special Issue Published on 3rd February, 2024
www.ycjournal.net

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

## TWO - DAY 47th ANNUAL CONFERENCE OF

# VIDHARBHA ARTHASHASTRA PARISHAD

3rd & 4th February, 2024

*Organized by*

# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

**MIDC Road Complex, Gadchiroli-442605, MH. (India)**

Guest Editor
**Dr. Shriram Kawale**
Pro Vice – Chancellor,
Gondwana University,
Gadchiroli.

Executive Editor
**Dr. Shilpa Athawale**
Coordinator, PGTD of Applied Economics,
Gondwana University,
Gadchiroli.

| | | | |
|---|---|---|---|
| 17. | **डॉ.हनुमंत अंकुशराव भोसले**<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग जी.एस कॉलेज, खामगाव<br>**डॉ संजय तुकाराम वराडे**<br>प्राध्यापक,<br>पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग जी.एस कॉलेज, खामगाव<br>**डॉ. नितीन ज्ञानदेव चौधरी**<br>सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख<br>पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग<br>श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय अकोला | डॉ पंजाबराव देशमुख: दुरदृष्टी असलेला सुधारणावादी नेता | 120 |
| 18. | **प्रा.सतीश आर.जाधव**<br>अर्थशास्त्र विभाग, न.प.शिवाजी महा. मोवाड,तह-नरखेड | डॉ.पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांचे सामाजिक व आर्थिक योगदान | 126 |
| 19. | **डॉ. गजानन सोमकुवर**<br>सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभागप्रमुख<br>बॅरि. शेषराव वानखडे कला वाणिज्य महाविद्यालय खापरखेडा | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदान | 131 |
| 20. | **डॉ. उषा एन. पाटील**<br>प्रोफेसर व अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>गोपिकाबाई सिताराम गावंडे महाविद्यालय उमरखेड | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार- एक विश्लेषण | 136 |
| 21. | **डॉ.आरती डी. महेशकर,**<br>सहा. प्राध्यापक, भगवंतराव कला महाविद्यालय,<br>सिरोंचा, जिल्हा. गडचिरोली | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 140 |
| 22. | **डॉ. हरिष एम. बावनगडे** | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार | 144 |
| 23. | **डॉ. कुमुदिनी भाऊराव जोगी,**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख, जगदंब महाविद्यालय,अचलपुर | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे भारताच्या कृषिविकासातील योगदान | 149 |
| 24. | **पंकज तायडे,**<br>सहयोगी प्राध्यापक,<br>भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज, पिंजर, अकोला | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषि कर्ज लवाद धोरण | 155 |
| 25. | **डॉ. संजय जे. कोठारी,**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>चांदूर बाजार, जि. अमरावती | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषि धोरण आणि शेतकऱ्यांचा आर्थिक विकास | 161 |

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

Two - Day 47th Annual Conference of Vidharbha Arthashastra Parishad
@ Gondwana University, Gadchiroli.
3rd & 4th February, 2024

**पंकज तायडे,**
सहयोगी प्राध्यापक,
भाऊसाहेब लहाने
ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,
पिंजर, जिल्हा अकोला

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषि कर्ज लवाद धोरण

***ABSTRACT***

विदर्भपूत्र, शिक्षण महर्षी तथा कृषीरत्न डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या कृषी व शैक्षणिक कार्याला विदर्भात जोड नाही. शेतकऱ्यांच्या समस्यांची सोडवणूक करणारा मसीहा असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. भाऊसाहेबांनी महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अग्रणी असणारी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती येथे स्थापन करून गोर गरिबांच्या घरापर्यंत शिक्षणाची गंगा वाहती केली. शिक्षणापासून दुरावलेल्या बहूजन समाजाला त्यामुळे शिक्षणाची दालन उपलब्ध झाली. भारताचे पहिले कृषीमंत्री म्हणून शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी त्यांनी केलेले कार्य महनीय आहे. त्यांच्या या कार्याची दखल जागतिक पातळीवर घेतली गेली आहे. डॉ पंजाबरावांना भारत सरकारने कृषी क्षेत्रातील सर्वोच्च मानाची कृषिरत्न ही मरणोत्तर पदवी बहाल करून गौरविलेले आहे. तेव्हाच त्यांच्या चाहत्या समाजाने त्यांना भाऊसाहेब ही उपाधी बहाल केली.

भारतीय कृषीक्षेत्राला केवळ भाऊसाहेबांसारखा हाडाचा व शेतकऱ्यांच्या व्यवसायाशी नाते असलेला कृषी पंडितच नवजीवन देऊ शकेल, या जाणिवेतून त्यांना कृषीमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. शेतकऱ्यांच्या समस्यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. मुळात ते शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांना समस्या सहज कळल्या. शेतमाल उत्पादित करतांना भांडवलाची समस्या कशी सोडवावी हे त्यांनी शेतकऱ्याला अवगत करण्याचे कार्य केले. सरकारमध्ये असतांना प्रसंगी सरकार सोबत भांडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. कृषी कर्ज मिळवणे आणि परत करणे ही शेतकऱ्यांची प्रमुख समस्या होती. सन १९१८ साली निर्माण झालेल्या मंदीमुळे कपाशीच्या किमतीत प्रचंड घट झाली. त्यामुळे शेतकरी कर्जपरतफेड करू शकला नाही. अशा स्थितीत सावकार प्रसंगी बँकांनी सुद्धा त्यांची पिळवणूक करण्याचा प्रयत्न केला. भाऊसाहेबांनी हे प्रयत्न हाणून पाडून शेतकरी आणि शेती व्यवस्था सुरक्षित करण्याचे महान कार्य कर्ज लवादाच्या माध्यमातून केले. त्याचा आढावा प्रस्तुत लेखात घेण्यात आला आहे.

**प्रस्तावना-**

विदर्भपूत्र, शिक्षण महर्षी तथा कृषीरत्न डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या कृषी व शैक्षणिक कार्याला विदर्भात जोड नाही. शेतकऱ्यांच्या समस्यांची सोडवणूक करणारा मसीहा असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. भाऊसाहेबांनी महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात

अग्रणी असणारी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती येथे स्थापन करून गोर गरिबांच्या घरापर्यंत शिक्षणाची गंगा वाहती केली. शिक्षणापासून दुरावलेल्या बहूजन समाजाला त्यामुळे शिक्षणाची दालन उपलब्ध झाली. भारताचे पहिले कृषीमंत्री म्हणून शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी त्यांनी केलेले कार्य महनीय आहे. त्यांच्या या कार्याची दखल जागतिक पातळीवर घेतली गेली आहे. डॉ पंजाबरावांना भारत सरकारने कृषी क्षेत्रातील सर्वोच्च मानाची कृषिरत्न ही मरणोत्तर पदवी बहाल करून गौरविलेले आहे. तेव्हाच त्यांच्या चाहत्या समाजाने त्यांना भाऊसाहेब ही उपाधी बहाल केली.

भारतीय कृषीक्षेत्राला केवळ भाऊसाहेबांसारखा हाडाचा व शेतकऱ्यांच्या व्यवसायाशी नाते असलेला कृषी पंडितच नवजीववन देऊ शकेल, या जाणिवेतून त्यांना कृषीमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. शेतकऱ्यांच्या समस्यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. मुळात ते शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांना समस्या सहज कळल्या. शेतमाल उत्पादित करतांना भांडवलाची समस्या कशी सोडवावी हे त्यांनी शेतकऱ्याला अवगत करण्याचे कार्य केले. सरकारमध्ये असतांना प्रसंगी सरकार सोबत भांडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. कृषी कर्ज मिळवणे आणि परत करणे ही शेतकऱ्यांची प्रमुख समस्या होती. सन १९१८ साली निर्माण झालेल्या मंदीमुळे कपाशीच्या किमतीत प्रचंड घट झाली. त्यामुळे शेतकरी कर्जपरतफेड करू शकला नाही. अशा स्थितीत सावकार प्रसंगी बँकांनी सुद्धा त्यांची पिळवणूक करण्याचा प्रयत्न केला. भाऊसाहेबांनी हे प्रयत्न हाणून पाडून शेतकरी आणि शेती व्यवस्था सुरक्षित करण्याचे महान कार्य कर्ज लवादाच्या माध्यमातून केले. त्याचा आढावा प्रस्तुत लेखात घेण्यात आला आहे.

## संशोधन पद्धती-

प्रस्तुत शोध निबंध पूर्णतः दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. डॉ पंजाबराव देशमुख यांच्या कार्यावर प्रकाशित साहित्याचे अवलोकन करून मांडणी करण्यात आली आहे.

## भाऊसाहेबांचा कृषिविषयक दृष्टीकोन-

डॉ. पंजाबराव देशमुखांचा जन्म शेतकरी कुटुंबातील त्यामुळे शेतकऱ्याच्या जीवनमानाचा त्यांना वेगळा परिचय करून घेण्याची गरज पडली नाही. भारतीय शेती पद्धतीचा त्यांनी सखोल अभ्यास केला. शेती करतांना शेतकऱ्याला कोण-कोणत्या समस्या येतात हे त्यांना चांगले कळत होते. ते कायद्याचे अभ्यासक असल्यामुळे शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवण्यासाठी काय केले पाहिजे हे त्यांनी ठरवले. त्यासाठी १९२७ साली शेतकरी संघाची स्थापना करून पहिले पाउल टाकले. शेतकरी कर्जबाजारी झाल्यास त्याची काय अवस्था होते? अशा स्थितीत शेतकरी कसा जगतो याचे त्यांनी जवळून अवलोकन केले. म्हणूनच त्यांनी शेतकऱ्यांचे जीवन उजळून टाकण्याची प्रतिज्ञा केली, आणि स्वतःला समाज कार्यासाठी झोकून दिले. शेतकरी सुखी तरच सर्व जग सुखी हा मंत्र त्यांनी नुसता जपला नाही तर त्या दिशेने त्यांनी अभिजात कार्य करायला सुरवात केली.

भाऊसाहेब बहुजनांचे हितचिंतक होते. त्यांनी केवळ शेतीच नव्हे तर सर्वसामान्यांना शिक्षण मिळावे यासाठी सुद्धा विशेष प्रयत्न केले. १९२७ साली स्थापन केलेल्या शेतकरी संघापासून तर १९५६ साली स्थापित अखिल भारतीय दलित संघापर्यंत त्यांनी समाजातील उपेक्षित बहुजनांच्या उत्थानासाठी जीवन खर्ची घातले. १९२७ ला अमरावती येथील अंबादेवी मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्याचा सत्याग्रह, १९३२ ला शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना,१९३३ चा कृषिकर्ज लवाद कायदा, १९५० ला पुणे येथे लोकविद्यापीठाची स्थापना या माध्यमातून बहुजनांचा विकास करण्याचे कार्य भाऊसाहेबांनी केले. १९६० साली दिल्ली येथे जागतिक स्तरावरील कृषी प्रदर्शन भरवून त्यांनी शेती बद्दल निष्ठा प्रकट केली. कृषी आणि कृषक विकास हा त्यांच्या अभ्यासाचा विशेष भाग होता.

शेतकरी हा समाजाचा पोशिंदा आहे. पण शेतकऱ्यांची दैनावस्था पाहून भाऊसाहेबांचा जीव कासावीस होत असे. शेतकरी ही समाजाची फार मोठी शक्ती आहे. हे

लोक पध्दतशीर विसरतात. भाऊसाहेब म्हणत असत की, शेतकरी जन्मभर कर्जात राहतो, कर्जातच मरतो तरी देशासाठी धान्य पिकवितो. हा शेतकऱ्यांचा धर्म आहे आणि तो धर्म त्याने तनमनाने जोपासला आहे. भारतातल्या अनेक शेतकऱ्यांची अनेक शतकापासून अशी स्थिती आहे की, त्याने पिकविलेल्या शेतमालाचे भाव तो ठरवू शकत नाही असे मत भाऊसाहेबांचे होते. सन १९२८ मध्ये भाऊसाहेब अमरावती जिल्हा कौन्सीलचे अध्यक्ष झाले. त्यांचा अभ्यास आणि प्रत्यक्ष कृतीमुळे भारताच्या कापूस बाजार समितीचे ते अध्यक्ष झाले. यामुळे त्यांना कापूस उत्पादक शेतकरी आणि त्यांच्या समस्यांचा सहज अंदाज आला. यामुळेच सन १९३३ मध्ये 'कर्ज लवाद' स्थापन करून घेवून शेतकरी सुरक्षित करण्याचे महान कार्य केले. त्यांचे कार्य आणि जिद्द पाहून त्यांना १९५२ ला स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात पंडित नेहरू समवेत कृषीमंत्री करण्यात आले.

**कृषी कर्ज लवाद**

वऱ्हाड प्रांत पांढऱ्या सोन्यासाठी म्हणजेच कापसासाठी अगदी पौराणिक काळापासून प्रसिद्ध आहे. वर्षानुवर्षे विदर्भातील शेतकरी कपाशी पिकाच्या माध्यमातून आपला चरितार्थ चालवतो आहे. कधी कमी तर कधी जास्त अशा दरात तो कापूस विकतो पण कापसाची शेती करणं सोडत नाही. सन १९१८ प्रचंड मंदी आल्यामुळे कापसाचा दर कमी झाला. शेतकरी पिक उभारणीसाठी घेतलेले कर्ज परत करू शकला नाही त्यामुळे कर्जबाजारी झाला. त्याच्यावर जमिन विकायची वेळ आली. अशा स्थितीत त्यांच्या मदतीला भाऊसाहेब धावून आले. भारताचे पहिले कृषीमंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कामाने कोट्यावधी शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारले होते. पण त्याही फार पुर्वीपासून पंजाबरावांनी शेतकरी कल्याणाचा वसा उचलला होता.

सन १९१४ च्या आसपास कापसाचा भाव २५० रुपये प्रतिखंडी होता. परंतु १९१८ च्या दुष्काळानंतर कापूस बाजारात प्रचंड मंदी आली. भाव एकदम २५ रुपयांपर्यंत घसरला. याच दुष्काळात राजस्थान व मारवाड प्रांतातून वऱ्हाडमध्ये काही लोक समूहाने स्थलांतरित झाले होते. त्यांनी कंजुषीने राहून संपत्ती गोळा केली आणि व्यापार करू लागले. हे व्यापारी शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करत असत. गरज पडली की त्याच शेतकऱ्याला कर्जाऊ रक्कम देवून आर्थिक मदत सुद्धा करीत असत. **वऱ्हाडातील कास्तकार या सावकारांकडून कर्ज रूपाने भांडवल घेवून शेती करायचे. व्यापारी सावकारांचा डोळा शेतकऱ्याच्या संपत्तीवर होता. दुष्काळी स्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकरी सावकारांचे तसेच बँकांचे कर्ज परत करू शकले नाहीत. अंतिमतः सावकारी पाशात अडकले. कोर्टातून परवानगी मिळवून सावकार आणि प्रसंगी बँकाही शेतकऱ्यांच्या गायी, म्हशी, बैल, भांडी, घरावरचे टिनपत्रे जप्त करून हर्रास करु लागले. कित्येकांच्या जमिनीही हर्रास होत होत्या. शेतसारा भरण्याची देखील कुवत शेतकऱ्यांमध्ये राहिली नव्हती. घरप्रपंच चालवणे शेतकऱ्यांसाठी फारच कठीण झाले होते.** जवळपास १० वर्ष शेतकऱ्यांच्या पिळवणुकीचा हा प्रकार चालू होता. या संपूर्ण घडामोडींवर भाऊसाहेबांचे लक्ष होते. शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक पाहून ते व्यतिथ होत होते.

शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक पाहून त्यावर कायदेशीर उपाय करण्याचे भाऊसाहेबांनी ठरवले. सन १९३०च्या आसपास स्वातंत्र्यपूर्व वऱ्हाड कायदेमंडळ निवडणुकीत पंजाबराव विजयी झाले. तेव्हा ते गव्हर्नर मॉन्टेग्य बटलरच्या मंत्रिमंडळात पहिल्यांदा मंत्री झाले. त्यांच्याकडे शिक्षण, शेती, लोककर्म व सहकार हि खाती दिली गेली. डॉ पंजाबरावांनी शेतकऱ्यांच हे दुःख अगदी जवळून अनुभवलं होत. शेतकऱ्यांना सावकारी जाचातून मुक्त करण्याची संधी मंत्री रूपाने भाऊसाहेबांना मिळाली. मंत्रीपदी विराजमान होताच त्यांनी सर्वात प्रथम शेतकरी कर्ज आणि त्यातून होणारी त्यांची पिळवणूक या प्रश्नाला वाचा फोडली. सावकारीमुळे शेतीत घाम गाळणारा आणि रक्त सांडणारा शेतकरी वर्गच नष्ट होण्याची वेळ

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

आली आहे. सदर बाब त्यांनी तत्कालीन सरकारच्या लक्षात आणून दिली.

शेतकरी आणि सावकार किंवा बँक यांच्यात कर्ज थकबाकी मुळे वाद निर्माण झाल्यास त्यावर कायदेशीर बाबीने चर्चा होवून निवाळा व्हावा, दुष्काळ तथा इतर नैसर्गिक कारणाने शेतकरी पिक कर्ज परत करू न शकल्यास त्याला परतफेड करण्याची संधी द्यावी, प्रसंगी सरकारने कर्ज माफी चा निर्णय घेतला पाहिजे असे त्यांना वाटत होते. शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर सरकार सोबत चर्चा झाल्यावर त्यांनी मंत्री म्हणून त्यावरील उपाय करण्यासाठी 'कर्ज लवाद' स्थापन करण्याचे सुचवले. शेतकरी कर्जाचा वाद निर्माण झाल्यास कर्ज लवाद त्यावर चर्चा करून तोडगा काढू शकेल अशी कार्यपद्धती त्यांनी सुचवली. कर्ज देणारा आणि कर्ज घेणारा यांच्या व्यवहाराची फेरतपासणी करण्याचे अधिकार या लवादाला मिळणार होता. 'कर्ज लवाद' शेतकरी आणि सावकार यांच्यात कर्ज परत करण्यावरून काही वाद झाल्यास त्यावर तोडगा काढण्याचे माध्यम म्हणून भाऊसाहेबांनी सुचवले होते. शेतकरी कर्ज भरण्यास असमर्थ ठरल्यास त्याच्या काय अडचणी आहेत, त्या कर्ज लवादाच्या माध्यमातून समजून घेतले जावे. आणि शेतकरी तसेच व्यापाऱ्यांना न्याय मिळावा असे भाऊसाहेबांना अपेक्षित होते.

भाऊसाहेबांनी २५ ऑगस्ट १९३२ रोजी मध्य प्रांत वऱ्हाडच्या असेम्बलीत त्यांनीच स्थापन केलेल्या शेतकरी संघ या पक्षामार्फत कर्ज लवाद बिल मांडले. पण तत्पूर्वी ७ ऑगस्टला या विधेयकातला काही भाग तपशिलासह अग्रलेख लिहून एका दैनिकाने प्रकाशित केला. समाजातले तथाकथित सावकार, सरकारी अधिकारी आणि वकील हे त्यांच्या हितसंबंधांमुळे या लवादाच्या विरोधी होते. पण तत्कालीन अर्थमंत्री ऑर्थर एडवर्ड नेल्सन आणि पुढे त्यांच्या जागेवर काम पाहणारे हाइड गोवेन यांना पंजाबरावांनी शेतकऱ्यांची परिस्थिती समजावून सांगितली आणि यासंबंधीचे विधेयक आणण्याचे ठरवले. विषय सभागृहात पटलावर येताच विरोधकांनी 'लोकमता' ला टाकण्याची मागणी केली. ज्या शेतकऱ्यांच्या हितासाठी हे बिल आणले गेले, त्या शेतकऱ्यांचाच संभ्रम करून देण्यात विरोधक यशस्वी झाले होते. सोबतच हे बिल पारित झाले तर शेतकऱ्यांना पैशाच्या अडचणींच्या वेळी कोणीही मदत करणार नाही. तसेच सावकार आणि बँका यांनी कर्जरूपाने पैसे देण्यास नकार दिल्यास शेतकऱ्यास आर्थिक मदत कोण करील असे प्रश्न निर्माण करून कर्ज लवाद बिल बद्दल संभ्रम निर्माण करण्यात विरोधक यशस्वी झाले.

या सर्व घडामोडी बाबत पंजाबराव दु:खी मनाने म्हणाले की, "आपला शेतकरी इतका भोळा आहे की, तो नकळत स्वतःच्याच कल्याणाच्या विरोधात शत्रूला मदत करतो. कष्ट करणाऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नाच्या बाबतीत असेच घडते." विरोधकांनी या विधेयकास विरोध करण्यासाठी अल्पावधीतच १४ संघटनांचा जन्म झाला. ह्या संघटना केवळ कागदावरच होत्या. शेकडो बिलविरोधी तारा पाठवण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या या २६ कलमी विधेयकाला ७० दुरुस्ती सूचना करण्यात आल्या होत्या. सोबतच हे बिल घाईघाईने मंजूर केल्यास दुष्परिणाम होतील, सामाजिक व भावनिक ऐक्याला तडे जातील, धनको व ऋणको यांच्या नैतिक संबंधात शासनाने ढवळाढवळ करणे अन्यायाचे आहे असे युक्तिवाद प्रतिनिधींनी कायदे मंडळात केले.

२५ ऑगस्ट १९३२ ते २६ जानेवारी १९३३ पर्यंत हे बिल कायदेमंडळापुढे होते. दरम्यान डॉ पंजाबराव आणि त्यांच्या शेतकरी संघ या पक्षाने बिलाच्या जनजागृतीसाठी प्रांतभर प्रचार सुरु केल्या. लोकांना या विधेयकासाठी सरकार कडे आग्रह धरण्यासाठी आंदोलन करण्याचे आवाहन भाऊसाहेबांनी केले. अखेरीस २६ जानेवारी १९३३ रोजी हे बिल मंजूर झाले. पण अजूनही एक त्रुटी होती. अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ या वऱ्हाडच्या चार जिल्ह्यांना वगळून उर्वरित मध्य प्रांतातल्या प्रदेशाला हा कायदा लागू झाला. कारण वऱ्हाड निजामाच्या मालकीचा होता आणि तो फक्त प्रशासनासाठी ब्रिटिशांच्या ताब्यात होता. विरोधकांच्या वऱ्हाडाला या कायद्यातून वगळण्याच्या मागणीला

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399
RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences
ISSN 2277-8071

पंजाबरावांनी कायदेशीर आव्हान दिले. उच्च वर्गाचा विरोध डावलायला कमिशनर ग्रीन फिल्ड तयार नव्हते. पण सोबतच ते पंजाबरावांचे मित्र होते. त्यामुळे सावकारवर्गाचा विरोध मोडून काढण्याची हमी देऊन ग्रीनफिल्ड यांच्या मनात पंजाबरावांनी पुन्हा सकारात्मक मत तयार केले. वऱ्हाडच्या कायदेमंडळ प्रतिनिधींची सभा गव्हर्नरांच्या उपस्थितीत अमरावती जिल्हा कौन्सिलच्या सभागृहात घेऊन वऱ्हाडालाही हा कायदा लागू करण्यात आला.

प्रस्तुत कायदा शेतकऱ्यांचे कर्ज वितरण आणि वसुली यात सुसूत्रता आणण्यासाठी होता. हा **शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा कायदा होता. या बिलाच्या मसुद्यात एक लवाद कोर्ट गठित करण्याचे सुचवले होते. प्रथम श्रेणीचा शासकीय अधिकारी व लोकांमधून नियुक्त केलेल्या सदस्यांचा यात समावेश होता. धनको व ऋणकोपैकी कोणालाही कर्जाच्या निकालासंबंधी अर्ज करण्याचा अधिकार होता.** तसेच लवादाच्या निर्णयासंबंधी दुसऱ्या कोर्टात अपील व रिव्हिजन करण्याचा अधिकारच नव्हता. सुनावणीच्या वेळी वकील ठेवण्याची दोन्ही पक्षांना बंदी होती. लवादाचा निर्णय अंतिम मानला होता. कर्जफेडीचे सोयीस्कर हप्ते पाडले होते. अशा सुविधा देणारा हा कायदा शेतकऱ्यांचे रक्षण करण्यास सक्षम होता.

वऱ्हाडातल्या हजारो कर्जपीडित शेतकऱ्यांना या लवादाचा फायदा झाला. कर्ज देणारा आणि कर्ज घेणारा यांच्या व्यवहाराची फेरतपासणी करण्याचे अधिकार या लवादाला मिळाले. यामुळे शेती कर्जाबद्दलची सत्यता बाहेर येण्यास मोठी मदत झाली. त्यातून कर्जदार शेतकऱ्यांची ९० टक्के शेती वाचली. निवाडा शेतकऱ्यांच्या बाजून होऊ लागला. **परतफेड केलेले कर्ज वजा करून उरलेल्या रकमेचे वार्षिक हप्ते पाडण्यात आले. ही हप्त्यांनी केलेली कर्जफेड झाल्यावर सावकाराने हडपलेली जमीन शेतकऱ्यांना परत मिळाली.** पंजाबरावांनी मध्य प्रांत वऱ्हाड सरकारला हा कायदा करायला भाग पाडले नसते तर इतर राज्यांप्रमाणेच वऱ्हाडातही आज बडे जमीनदार व शेतमजूर असे दोनच वर्ग दिसले असते. इथला शेतकरीवर्ग नावाला देखील उरला नसता. या विधेयकासाठी पंजाबरावांनी घेतलेल्या प्रयत्नामुळेच त्यांना भारताचे पहिले कृषी मंत्री होण्यापूर्वीपासून 'कृषक क्रांतीचे जनक' मानले जावू लागले.

**समारोप-**

भारतीय शेतकरी उद्योजक व्हावा म्हणून त्यांच्या हिताच्या योजना राबविणारा कृषिक्रांतीचा अग्रदूत म्हणून भाऊसाहेबांचा गौरव करावा लागेल. कृषिमंत्री असताना त्यांनी केलेली कामे अद्वितीय आहेत. भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांच्या हिताचा 'कर्ज निवारण कायदा' पास करून अंमलात आणला. भारत कृषक समाजाची स्थापना करून त्यांनी पंजाबपासून सर्व प्रांतात शेतकरी संघटित केले. भारतीय शेतकऱ्यात नवजागरण आणि नवप्रबोधन केले. यातून आर्थिक नवचेतना त्यांनी ग्रामीण भारतात निर्माण केली. भारतीय शेतकरी वर्ग शिक्षणात जेवढी प्रगती करील आणि आर्थिक संपन्नतेत जेवढी प्रगती करेल तेवढी भारताची सर्वंकष प्रगती वेगाने घडेल अशी भाऊसाहेबांची विचारधारा त्यांच्या प्रयत्नातून दिसते..

कर्जलवाद विधेयक केवळ शेतकऱ्यांच्या ऋणमुक्तीचा कायदा नव्हता, ती तर डॉ पंजाबराव देशमुखांनी रचलेली भारतातील कृषी क्रांतीची पहिली पायरी होती. कृषक ऋणमुक्त होणे याचाच अर्थ कृषकांचे अर्थबल, संघटना बल वाढणं हा होता. भाऊसाहेबांनी भारतीय शेती आणि शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा असल्यामुळे सशक्त करण्यासाठी त्यांच्या कार्यकाळात प्रयत्न केले. पण त्यांनी आखून दिलेली व्यवस्था सुरक्षित शेती व्यवस्थेची घडी त्यांच्या नंतर च्या सरकारांनी मोडकळीस आणली.

आज आपल्या देशाला स्वातंत्र्य प्राप्त होऊन ७५ वर्षे झालीत. पण शेतकऱ्यांना परावलंबी आणि लाचार करून आत्महत्या करण्यास भाग पाडणाऱ्या दळभद्री व्यवस्थेचा निषेध करावा तेवढाच कमी आहे. भाऊसाहेब याच गुलामगिरीच्या विरोधात लढले. मानवजातीचा पोशिंदा शेतकरी राजा ऋणमुक्त करण्यासाठी भाऊसाहेबांनी भारतातील कृषक कर्जमुक्तीचा पहिला कायदा मध्यप्रांत

व-हाडाच्या कायदे कौन्सिलमध्ये मंजूर करून घेतला. सावकारशाहीवर हा प्रचंड आघात होता. शेतकरी मेला तर भारतच जिवंत राहणार नाही. ग्रामीण भारत दारिद्र्यात अडकला तर समृद्ध भारत निर्माण होणे शक्य नाही. शेतकरी वर्गाच्या जमिनी वाचवून त्यांचे कर्जमुक्त धोरण यशस्वी करणे हे त्यांचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले.

सद्यस्थितीत शासन शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करू शकत नाही ही शोकांतिका आहे. भारतात लाखो शेतकरी आत्महत्या करत आहेत. विदर्भात तर शेतकऱ्यांचे दुर्दैवी आत्महत्या सत्र सुरूच आहे. प्रधानमंत्री पॅकेज किंवा मुख्यमंत्र्याच्या घोषणा मात्र यावर कोणतेही उपाययोजना करू शकले नाही हे आजचे वास्तव आहे.

भारताचे दारिद्र्य, अज्ञान आणि विषमता दूर करण्याची कृतिशीलता समाजात निर्माण होणे ही काळाची गरज आहे. आज भारत आणि इंडिया असे दोन भेद निर्माण झाले असून सरकारी धोरणे ही फक्त इंडियातील उच्चभ्रू लोकांचा विचार करीत आहे. मात्र भारतातील ८०टक्के जनतेला कोणीही वाली नाही. शेतकरी सुखी झाला पाहिजे. तो देशाचा अन्नदाता आहे अशी बोलघेवडी भाषा राज्यकर्ते वापरतात. पण प्रत्यक्षात धोरणे मात्र भांडवलदारांच्या हिताची आहेत. विशेष आर्थिक क्षेत्राच्या (SEZ) नावाखाली शेतीचा नाश होत आहे. औद्योगिकीकरणाच्या नावाने शेतीचे पाणी, जमीन अंबानी अदानीसारखे मोठे उद्योजक गिळंकृत करीत आहेत. या पार्श्वभूमीवर भाऊसाहेबांचा कृषकक्रांतीचा विचार आज स्वीकारून त्याप्रमाणे धोरणे अंमलात आणली तरच कृषकक्रांती होईल आणि डॉ पंजाबरावांचे संमृद्ध भारताचे स्वप्न साकारले जाईल असे मनोमन वाटते.

**संदर्भसूची :**


१) मोहोड सुधाकर (१९७५), 'एक भारतीय जिनिअस - लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख'
२) मोहिते उत्तमराव (१९८३) 'जागतिक कृषकक्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख' श्री शिवाजी मुद्रण अमरावती
३) पाटील पी.बी. (१९९०), 'महाराष्ट्रातील थोर विचारवंत', के सागर प्रकाशन पुणे
४) अंधारे रमेश (२०१०), 'मुद्रा महाराष्ट्राची', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
५) गुडधे संजय, बोबडे कुमार (२०१३), 'डॉ पंजाबराव देशमुख- तत्वज्ञान आणि सामाजिक योगदान', इन्स्टिट्यूट ऑफ सोशल रिसर्च अँड एज्युकेशन, कॅम्प अमरावती.
६) डॉ. पंजाबराव देशमुख लोकराज्य विशेषांक (महाराष्ट्र शासन)